
गुरू दत्त: ये दुनिया अगर मिल भी जाए तो क्या है...

१0 ऑक्टोबर रोजी गुरू दत्त यांची ४० वी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचा एक प्रयत्न...



चौदहवी का चांदमध्ये वहिदासह



९ जुलै १९२५ ते १० ऑक्टोबर १९६४, उणापुरं ३९ वर्षांचं आयुष्य. तरीही अत्यंत समृद्ध जीवन जगणाऱ्या गुरू दत्त यांच्या निधनाला चार दशकं पूर्ण होतील.


'वो जब याद आये, बहोत याद आये...' गुरू दत्तांच्या एका नावाशी अशा अनेक आठवणी जोडलेल्या आहेत. दिग्दर्शक म्हणून त्यांचे सुपरहिट चित्रपट *आरपार, सीआयडी, प्यासा* आणि *कागज के फूल* वगैरे. वहिदा रेहमानबरोबर फुललेले प्रेमसंबंध आणि नंतर त्यात निर्माण झालेला दुरावा, पत्नी गीता दत्त यांच्यासह वैवाहिक जीवनात निर्माण झालेल्या समस्या, ३२व्या वर्षी *कागज के फूल*द्वारे सर्जनशीलतेचं सर्वोच्च शिखर गाठल्यानंतर आयुष्यात निर्माण झालेली पोकळी, त्या सिनेमाला मिळालेल्या अपयशामुळे आयुष्यात पुन्हा कधीच स्वतःच्या निर्मितीतला सिनेमा दिग्दर्शित न करण्याचा हट्ट, त्यांच्या निधनानंतर पत्नी गीता दत्त हिने दारूच्या नशेत चूर राहून करून घेतलेला स्वतःचा अंत आणि मुलगा तरुण याने जाणत्या वयात केलेली आत्महत्या...

गुरू दत्त यांचं आयुष्य पहिल्यापासूनच वादळी ठरलंय. कर्नाटकमध्ये त्यांचा जन्म झाला तेव्हा आई वासंती हिचं वय जेमतेम १६ वर्षं होतं. त्यांचे वडील शिवशंकर शाळेत मुख्याध्यापक होते. आई नुसतीच गृहिणी नव्हती तर चांगली लेखिकाही होती. त्यांनी अनेक गाजलेल्या बंगाली साहित्याचा कन्नडमध्ये अनुवाद केला होता. शिवाय स्वतःही स्वतंत्रपणे कथालेखन केलं होतं. आई-वडिलांमध्ये होणारी सततची

पत्नी गीतासहः आनंदाच्या क्षणी




गुरू दत्तः
प्यासा शायर!



गुरू दत्तंच्या कलेचा वारसा जपणारे आप्तः भाची कल्पना लाजमी, बहिण ललिता लाजमी आणि मुलगा अरुण(खाली)



भांडणं, सात महिन्याच्या धाकट्या भावाचा मृत्यू, एक वेडसर काका आणि घरादारावर असलेलं मामाच्या कुटूंबाचं वर्चस्व या सगळ्या गोष्टींचा गुरू दत्तंच्या बालमनावर विपरित परिणाम झाला असण्याची शक्यता आहे. बी. बी. बेनेगल नावाच्या एका स्नेह्यांच्या मदतीमुळेच गुरू दत्तना अलमोडामध्ये उदय शंकर यांच्याकडे पाच वर्षं नृत्याची तालीम घ्यायची संधी मिळाली. कारण पुढे याच योग्यतेच्या जोरावर त्यांनी पुण्याच्या प्रभात फिल्म कंपनीत नृत्यदिग्दर्शक म्हणून काम सुरू केलं. ते प्रभातमध्ये नृत्य दिग्दर्शक म्हणून काम करत असताना देव आनंद त्यांच्याबरोबर रूम पार्टनर म्हणून राहात होते. त्या दोघांची गाढ मैत्री झाली. आणि ती हिंदी चित्रपटसृष्टीला चांगलीच फळली. देव आनंदच्या नवकेतन बॅनरखाली बनलेल्या *अफसर*(१९५०) या पहिल्या चित्रपटाला फारसं यश मिळालं नाही. पण त्यानंतर प्रदर्शित झालेल्या *बाझी*चं दिग्दर्शन देव आनंदने आपल्या या परमप्रिय मित्राकडे सोपवलं. **सिनेमा हिट झाला. त्याच सिनेमातल्या 'तदबीर से बिगडी हुई तसवीर...'** या गाण्याच्या रेकॉर्डिंग दरम्यान गायिका गीता रॉयबरोबर त्यांचा परिचय झाला. परिचयाचं रुपांतर प्रेमात झालं. १९५३मध्ये गीताच्या आईच्या सांताक्रूझ येथील राहत्या घरी दोघंही विवाहबद्ध झाले. त्यानंतर *सीआयडी, आरपार, प्यासा* आणि *कागज के फूल*सारख्या चित्रपटांतून गुरू दत्तनी दिग्दर्शनाच्या क्षेत्रात फार मोठा पल्ला गाठला. पण घरी वैवाहिक जीवनात मात्र दुरावा निर्माण होत गेला. *कागज के फूल*ला अपेक्षित यश न मिळाल्यामुळे ते मनाने पार खचले. त्यानंतर प्रदर्शित झालेल्या त्यांच्या बॅनरच्या *चौदहवी का चांद*चं दिग्दर्शन त्यांनी सादिकवर सोपवलं. तर *साहब बीबी और गुलाम*चे दिग्दर्शक म्हणून अब्रार अल्वीचं नाव पडद्यावर झळकलं. अर्थात, दिग्दर्शनात गुरू दत्तंची प्रतिभा शंभर टक्के जाणवते. १९६४मध्ये *बहारें फिर भी आयेंगी* हा त्यांचा सिनेमा प्रदर्शनाधीन असतानाच झोपेच्या गोळ्या आणि मद्याच्या पूर्वनियोजित किंवा अनपेक्षित अतिसेवनाने त्यांचा अंत झाला.

असं म्हणतात की, मृत्यूच्या आदल्या रात्री त्यांनी राज कपूरना फोन करून एकत्र दारू पिण्याचं आमंत्रण दिलं होतं. पण राज कपूरचा ड्रायव्हर घरी निघून गेला होता आणि त्यांनी घरातच मद्यपान सुरू केलं होतं. एकाकीपणा असह्य होऊन त्यांनी पत्नी गीताला फोन केला. पण मुलं झोपली होती म्हणून तीही येऊ शकली नाही. अखेरीस एकाकीपणाचं दुःख त्यांनी मद्यसेवनात बुडवलं आणि नशेत जाणते किंवा अजाणतेपणी झोपेच्या गोळ्या प्रमाणाबाहेर घेतल्या. त्यातच त्यांचा अंत झाला. सकाळी सगळं जग जागं झालं तेव्हा गुरू दत्त कायमचे निद्राधीन झाले होते.

संवेदनशीलता, काव्यात्मक हाताळणी, अद्भूत कॅमेरावर्क अशा अनेक खुब्या एक सर्जक म्हणून त्यांनी आत्मसात केल्या होत्या. चित्रपटांच्या चित्रीकरणात त्यांचा हात धरणारा दुसरा कुणी नव्हता. गीतरहित चित्रपट बनवायची त्यांची खूप इच्छा होती. म्हणूनच चोप्राने जेव्हा *कानून* हा गीतरहित सिनेमा बनवायला घेतला तेव्हा हा सिनेमा चांगला चालू दे अशी प्रार्थना करायची विनंती त्यांनी वहिदा रहेमानला केली होती.

गुरू दत्त यांच्या निधनाला चार दशकं लोटली तरीही आज जुन्या पिढीइतकीच नवी पिढीही त्यांची चाहती आहे. ते उच्च मूल्यं जोपसणारे कलाकार-तंत्रज्ञ होते हे त्यांनी आपल्या सिनेमांतून सिद्ध केलं. आता त्यांच्या चाळीसाव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने **त्यांचे सुपुत्र अरुण यांनी मुंबईतील ग्रान्ड मराठा शेरेटन हॉटेलमध्ये शानदार कार्यक्रमाचं आयोजन** केलं आहे. गुरू दत्तंच्या भगिनी ललिता लाजमी(मान्यवर चित्रकार), भाची कल्पना लाजमी आणि चित्रपट क्षेत्रातले अनेक प्रतिष्ठीत आसामी कार्यक्रमाला हजेरी लावणार आहेत. यात सुनिधी चौहाण, साधना सरगम वगैरे गायक मंडळी गुरू दत्तंच्या चित्रपटांतली सोळा सुपरहिट गाणीही पेश करतील.

या कार्यक्रमाला वहिदा रेहमानही हजर राहतील असं अरुण दत्त यांनी सांगितलं. ★